**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

वर्ष २ रे ● अंक ४२ वा ● शुक्रवार २८ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 42 | Date : 28/06/2024 blow Friday Page 4 Price 4

# दणदणीत विजयासह टीम इंडिया फायनलमध्ये;
## अक्षर–कुलदीपच्या फिरकीसमोर इंग्लंडचं लोटांगण

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : भारतीय संघाने इंग्लंडवर दणदणीत विजय मिळवत टी-२० विश्र्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. भारताच्या फिरकीपटूंनी उत्कृष्ट गोलंदाजी करत इंग्लंडच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. जोस बटलर आणि हॅरी ब्रुक वगळता एकही फलंदाज फार काळ मैदानावर टिकू शकला नाही. अक्षर पटेल आणि कुलदीप यादव या दोन्ही फिरकीपटूंनी भारताच्या विजयात मोठी भूमिका बजावली. तर रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव यांच्या भागीदारीमुळे भारत एक चांगली धावसंख्या उभारू शकला. इंग्लंडवर भारतीय संघाने एकतर्फी विजय मिळवला आणि या विजयासह भारताने १० वर्षांनंतर टी-२० वर्ल्ड कपच्या फायनलमध्ये प्रवेश केला आहे. यापूर्वी २०१४ च्या टी-२० विश्र्वचषकात भारतीय संघ अंतिम फेरीत पोहोचला होता.




भारताने इंग्लंडला सर्वबाद करत टी-२० विश्र्वचषक २०२२ मधील उपांत्य फेरीतील १० विकेट्सच्या पराभवाचा व्याजासकट बदला घेतला आहे. २०२२ टी-२० विश्र्वचषकाच्या उपांत्य फेरीतही भारत आणि इंग्लंडचे संघ आमनेसामने आले होते. त्या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना १६९ धावा केल्या होत्या. त्याचवेळी इंग्लंडने एकही विकेट न गमावता हे लक्ष्य गाठले होते. पण यावेळी भारतीय संघाने एकतर्फी विजय मिळवत आपला बदला पूर्ण केला.

भारताने दिलेल्या १७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बटलरने संघाला चांगली सुरूवात करून दिली. बटलरने अर्शदीपच्या तिसऱ्या षटकात ३ चौकार लगावत भारताला धक्का दिला, पण रोहित शर्माने फिरकीपटूला साजेशा खेळपट्टीवर स्पिन अटॅक सुरू केला. अक्षर पटेलला चौथे षटक देण्यात आले आणि त्याने पहिल्याच चेंडूवर बटलरला बाद करत मोठा ब्रेकथ्रू मिळवून दिला. तर बुमराहने पुढच्या षटकात भेदक गोलंदाजी करत फिल सॉल्टला क्लीन बोल्ड केलं.

अक्षरच्या पुढच्या षटकात पुन्हा एकदा पहिल्याच चेंडूवर त्याने जॉनी बेअरस्टोला क्लीन बोल्ड करत खातेही उघडू न देता माघारी धाडले. यानंतर पुन्हा एकदा आठव्या षटकातील पहिल्याच चेंडूवर मोईन अलीला पंतने झटपट स्टंपिंग करत बाद केलं. अक्षरनंतर फिरकी विभागाकडून विकेटस घेण्याची जबाबदारी कुलदीपने घेतली आणि नवव्या षटकाच्या पहिल्याच । पान २ वर

# राज्याच्या अर्थव्यवस्थेत ७.६ टक्क्यांची वाढ अपेक्षित,
## अजित पवारांकडून महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल सादर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : महाराष्ट्राच्या विधानसभेचं पावसाळी अधिवेशन आजपासून (२७ जून) सुरू झालं आहे. दरम्यान अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आर्थिक वर्ष २०२३-२४ चा महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला. या अहवालानुसार महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ७.६ टक्क्यांनी वाढेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.तर देशाच्या अर्थव्यवस्थेतही ७.६ टक्क्यांची वाढ होण्याची अपेक्षा आहे. राज्याच्या कृषी तसेच कृषीपुरक क्षेत्रातही १.९ टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे.




या आर्थिक पाहणी अहवालानुसार, राज्याच्या कृषी व संलग्न क्षेत्राचा एकंदरीत विचार करता पिकांच्या विभागात १.५ टक्के घट होऊ शकते, असं म्हटलं आहे. तर, वनसंवर्धनात ९.२ टक्के, मासेमारी व जलसंवर्धनात २.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. उद्योग क्षेत्रात ७.६ टक्के, वस्तू निर्मिती क्षेत्रात ७.५ टक्के, बांधकामात ६.२ टक्के, राज्याच्या व्यापार, दुरुस्ती, हॉटेल्स व उपहारगृहे, वाहतूक, साठवण व दळणवळण, तसेच प्रसारणाशी संबंधित सेवा क्षेत्रांत ६.६ टक्के, वित्तीय, स्थावरमालमत्ता व व्यावसायिक सेवांमध्ये १०.१ टक्के वाढ अपेक्षित आहे, सार्वजनिक प्रशासन, सुरक्षा व इतर सेवांमध्ये ७.६ टक्के, तर सेवा क्षेत्रात ८.८ टक्के वाढ अपेक्षित आहे.

या आर्थिक वर्षात राज्याच्या आर्थिक विकासात सेवा क्षेत्राचा सर्वात मोठा (६३.८ टक्के) वाटा असून त्याखालोखाल उद्योग (२५ टक्के) क्षेत्राचा नंबर लागतो. कृषी व संलग्न कार्यांममध्ये ११.२ टक्के वाढीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गेल्या दशकभराचा विचार करता राज्याच्या विकासात सेवा क्षेत्राचा सरासरी ५७.१ टक्के हिस्सा असून त्याखाली उद्योग (३०.९ टक्के) क्षेत्राचा नंबर लागतो. तर, कृषी आणि इतर संलग्न क्षेत्रांची १२ टक्के हिस्सेदारी आहे.

२०२३-२४ चं राज्याचं उत्पन्न ४०.४४ लाख कोटी रुपये असून त्यामध्ये आर्थिक । पान २ वर

# आमदार समाधान आवताडे यांचे प्रमोशन.... विधानसभेच्या तालिका अध्यक्ष पदी नियुक्ती



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढ्याचे भारतीय जनता पक्षाचे आमदार समाधान आवताडे यांना प्रमोशन मिळाले असून पक्षाने त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे विधानसभेच्या तालिका अध्यक्षपदी समाधान आवताडे यांची वर्णी लागली आहे प्रथमच आमदार म्हणून निवडून आलेले अवताडे यांच्यासाठी ती मोठी संधी मानली जात आहे.विधानसभेच्या पावसाळी अधिवेशन वर आजपासून तारीख २७ जून सुरू झाले आहे विधानसभेच्या कामकाजाची सुरुवात ही जनगण आणि गर्जा महाराष्ट्र माझा या गीताने झाली त्यानंतर विधानसभे अँड राहुल नार्वेकर यांनी विधानसभा अध्यक्षाची तालिका अध्यक्ष म्हणून पाच जणांची निवड जाहीर केली आहे

विधानसभेची तालिका अध्यक्ष म्हणून भाजपकडून दोघांना संधी देण्यात आले आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस एकनाथ शिंदे । पान २ वर

# सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार दिनांक ०१ जुलै २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली.या लोकशाही दिनात मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल तसेच माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली

# अवैध वाळू वाहतुकीवर वाहतुकीवर महसूल प्रशासनाची कारवाई



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. तालुक्यात महसूल विभागाच्या भरारी पथकाव्दारे पंढरपूर येथील चंद्रभागा नदीपात्रात वाळू चोरीसाठी वापरण्यात येणारे ४ तराफे नष्ट केले तर शिरढोण येथे वाळू उपसा करत असताना एक जेसीबी नष्ट करण्यात आला असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.पंढरपूर तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इतापे व तहसिलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पंढरपूर येथील । पान २ वर

# पालखी सोहळ्यानिमित्त वाहतूक मार्गात बदल

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

श्री संत ज्ञानेश्र्वर महाराज पालखी सोहळा दि. ११ जुलै २०२४ रोजी नातेपुते पोलीस ठाणे हददीत व दिनांक १२ जुलै २०२४ रोजी श्री तुकाराम महाराज यांची पालखी अकलुज पोलीस ठाणे हददीत प्रवेश करणार आहे. दोन्ही पालखी सोहळयात लाखो वारकरी सहभागी होणार असल्याने वारकरी हे पायी पंढरपूर कडे येत असतात. पालखी बरोबर त्यांचे दिंडया व वाहने ही सोबत असतात त्यामुळे पालखी मार्गावर वाहतुकीची कोंडी होवु नये याकरीता दि. ०९ जुलै ते १८ जुलै २०२४ रोजी या कालावधीत अकलुज व पंढरपूर या पालखी मार्गावर या वाहतुक मार्गात बदल करण्यात आला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ च्या कलम ३३ (१) (ब) अन्वये प्राप्त अधिकारान्वये आदेश पारीत केले आहेत. पंढरपूर कडून पुणे येथे जाणारे वाहने वाखरी-साळमुख फाटा-पिलीव-म्हसवड-फलटण किंवा पंढरपूर-टेंभुर्णी पर्यायी मार्गाने पुणेकडे जातील. पुणे-फलटण येथुन पंढरपूरकडे येणारी वाहने फलटण-म्हसवड-पिलीव-साळमुख चौक-पंढरपूर अथवा पुणे-टेभुर्णी मार्गे पंढरपूरकडे येतील. वेळापूर येथुन पंढरपूर कडेयेणा-या वाहने साळमुख चौक-सातारा रोड या पर्यायी मार्गाने पंढरपूरकडे येतील. सांगोला येथून पुणेकडे जाणा-या वाहने (सांगोला येथून पुणेकडे जाणारी जड वाहतुक वगळून - सांगोला-साळमुख चौक वेळापूर-अकलुज-इंदापूर. ) या पर्यायी मार्गाने जातील. पुणे येथुन इंदापूर मार्ग पंढरपूर येथे येणारी वाहने टेंभुर्णी-पंढरपूर पर्यायी मार्गानी येतील. अकलूज येथून पंढरपूर मार्गे सोलापूरकडे जाणारी वाहने अकलुज-टेभुर्णी या पर्यायी मार्गाने जातील. सोलापूर येथुन पंढरपूर मार्गे अकलुजकडे जाणारी वाहने सोलापूर-टेंभुर्णी-अकलुज या पर्यायी मार्गाने जातील. सदरचा आदेशाचा अंमल हा दिनांक ९ जुलै २०२४ रोजी ००.०१ वा. पासुन ते १८ जुलै २०२४ रोजी २४.०० वा पर्यत अंमलात राहील.असेही आदेशात नमूद केले आहे.

# सशस्त्र सेनेतील जवानांसाठी विभागीय आयुक्त कार्यालयात रक्तदान शिबिर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे/प्रतिनिधी:विभागीय आयुक्त कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने विभागीय आयुक्त कार्यालयात सशस्त्र सेनेतील जवान आणि सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयासाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी ९० रक्ताच्या पिशव्या संकलित करण्यात आल्या. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी रक्तदान करून शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी उपायुक्त वर्षा लड्डा-उंटवाल, निलीमा धायगुडे, पूनम मेहता, वैशाली इंदानी, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ भंडारे, सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाचे मेजर अनुराग, गट विकास अधिकारी भूषण जोशी, सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्त पेढीचे समन्वयक प्रणाल ढेकणे यांच्यासह विभागीय आयुक्त कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. शिबिरात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी




कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांनी रक्तदान केले. यावेळी मेजर अनुराग यांनी आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांना प्रमाणपत्र दिले तर आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांच्या हस्ते रक्तदान केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना । पान २ वर

# छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सहायक आयुक्त समाज कल्याण, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे जिल्हा सोलापूर यांच्या वतीने. डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा पार्क चौक येते राजश्री शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी नागेश चौगले सहायक आयुक्त समाज कल्याण, प्रणिता कांबळे प्रकल्प अधिकारी बार्टी,समाज कार्य विभाग प्राचार्य, कार्यलयीन कर्मचारी, समतादूत उपस्थिती होते.

बार्टी च्या वतीने सम्पूर्ण महाराष्ट्र राजेंषी शाहू महाराज १५० व्या जयंती निमित्त सामाजिक न्याय दिन सप्ताह उदगाटन करण्यात आले.२६ जून ते २ जुलै या कालावधी मध्ये शाहू महाराज यांच्या जीवनावर प्रबोधन कार्यक्रम, व्याखन, निबंध स्पर्धा, प्रश्र्न मंजुषा, चालता बोलता कार्यक्रम, वृषारोपण असे विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहे.



## संपादकीय

### संवेदना गोठल्याचे निदर्शक..

वसईत घडलेली घटना तर माणुसकीला शरमेने मान खाली घालायला लावणारी आहे. सहा वर्षे जिच्यावर जिवापाड प्रेम केले, तिच्याच डोक्यात पान्याचे घाव घालताना प्रियकराचा हात थरथरला नाही. पोलीस तपास होईल, त्यामागचे निश्चित कारणही समोर येईल. पण अनावर झालेल्या रागाने एका निष्पाप तरुणीचा बळी घेतला त्याचे काय? संबंधांमध्ये वितुष्ट जरी आले तरी, ते सामंजस्याने किंवा दुसऱ्या एखाद्या जबाबदार व्यक्तीच्या मध्यस्थीने त्यातून मार्ग काढता येऊ शकतो, असा विचार तो करू शकला नाही, हे खेदजनक आहे. गैरसमज आणि संशय हे दोन व्यक्तींमधील संबंधाचे मोठे शत्रू असतात, ते दबा धरून बसलेले असतात, त्यांच्यापासून दोघांनी फार सावध राहावे लागते. अव्यक्त प्रेम आणि अतिरेकी प्रेम याचा शेवट असा भयावह होऊ शकतो, याचा प्रत्यय अनेकदा आला आहे. वसई पूर्वेच्या वालीव येथे आरती यादव या २२ वर्षीय तरुणीची २९ वर्षीय रोहित यादव याने भर रस्त्यात केलेली हत्या अतिरेकी प्रेमाचे स्पष्ट उदाहरण आहे. साधारणपणे दोन वर्षांपूर्वी नवी दिल्लीत श्रध्दा वालकर हिची हत्या असो वा गेल्यावर्षी मीरा रोड येथील सरस्वती वैद्य हिची हत्या असो, या घटनाही त्याच पठडीतील आहेत. आपल्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो, याची पुसटशीही कल्पना श्रध्दा, सरस्वती आणि आरती यांना आली नसावी का? तसे संकेत मिळाले असतील तर, मग त्या सावध का झाल्या नाहीत? या नाण्याची दुसरी बाजू ही की, आता नकार पचविणेसुध्दा जड होत चालले आहे. मुलीकडून नकार येताच, पुरुषी अहंकार जागा होतो आणि त्याचे पर्यवसान गंभीर गुन्ह्यातच होते. कल्याणमध्ये एका २५ वर्षीय तरुणाने एकतर्फी प्रेमातून बारा वर्षीय मुलीची हत्या केली. सर्वात गंभीर म्हणजे, त्याने मुलीच्या आईसमोरच तिच्यावर चाकूने सात ते आठ वार केले. या सर्व घटनांचा मथितार्थ एकच आहे तो म्हणजे, मानवी संवेदना बोथट होत चालल्या आहेत. पृथ्वीतलावरील सर्व प्राण्यांमध्ये मनुष्यप्राणी श्रेष्ठ गणला जात असला तरी, त्याच्या या कृती पशुत्वापेक्षाही हीन आहेत. आरती हिच्या हत्येच्या वेळी आजूबाजूला लोक होते. त्यातल्या अनेकांनी बघ्याची भूमिका घेतली. वसईत डोळ्यादेखत गुन्हा घडत असताना एकाही व्यक्तीचे रक्त उसळले नाही, हे संवेदना गोठल्याचे निदर्शक आहे.

# शाहू महाराज आणि जातिभेद निर्मूलन : प्रा.डी.डी.मस्के



महात्मा फुले यांच्या निधनानंतर शाहू महाराजांचे कार्य सुरू झाले आणि त्यांच्या अस्ताच्या वेळी डॉ. आंबेडकरांचा उदय झाला. भारताच्या तत्कालीन राजकारणात जसे टिळक पर्वाचा अस्त होऊन गांधी पर्व सुरू झाले तसे महाराष्ट्राच्या राजकारणात शाहू पर्वाचा अस्त होऊन आंबेडकर पर्व सुरू झाले. खरे तर शाहू महाराजांच्या कारकिर्दीच्या अखेरच्या कालखंडात डॉ.आंबेडकरांचा अस्पृश्यांचा उदयान्मुख नेता म्हणून उदय झालेला होता. महाराजांच्या अस्पृश्योद्धार कार्याचा गौरव करताना डॉ. आंबेडकर यांनी म्हटले होते की,त्यांच्यासारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता व पुढेही लाभेल की नाही याबद्दल आम्हास शंका आहे हे दोघे महापुरुष एकमेकांचे मोठेपण जाणून होते. सांप्रत बहुजन समाज तर महात्मा फुले राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपले आराध्य दैवते मानतो. शाहू महाराजांनी आपल्या हयातीत अनेक चळवळी उभ्या केल्या. अनेक चळवळीचे नेतृत्व केले.तर अनेक चळवळींना प्रेरणा व साहाय्य केले. त्यात वेदोक्त चळवळ, वस्तीग्रह चळवळ, प्राथमिक शिक्षण चळवळ, अस्पृश्योद्धार चळवळ, जातिभेद निर्मूलन चळवळ, भटक्या विमुक्त जातींच्या उद्धाराची चळवळ, सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेत्तर चळवळ,कामगार चळवळ, इत्यादी चळवळींचा समावेश करावा लागेल.

मूळ मानवसमाज हा इथून तिथून एकच.त्याची एकच जात, ती म्हणजे माणूस ही संकल्पना स्वीकारली की जातीभेदही राहात नाही आणि अस्पृश्यताही राहात नाही. ही संकल्पना समतेची होती तसेच ते मानवतावादाची होती. स्वातंत्र्य समता व बंधुत्व या तत्त्व त्रयींना सामाजिक क्षेत्रात अग्र पूजेचा मान देऊन आपल्या सर्वांगीण विकास साध्य करता आला तो पाश्रि्चमात्य राष्ट्रांना. मात्र भारतात या तत्त्व त्रयींच्या वाटचालीत म्हणजेच सामाजिक प्रगतीच्या मार्गावर जातीभेद ही फार मोठी धोंड उभी होती ही धोंड बाजूला सारुन प्रगतीचा मार्ग मोकळा करणे हे सहज साध्य गोष्ट नव्हती. कारण जातीभेद हे हिंदू धर्म व हिंदू समाज याचे व्यवच्छेदक लक्षण होते.मुळात जातींच्या उच्चनीचेतेच्या कल्पनेवरच हिंदू समाजाची उभारणी झालेली होते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या समाज रचनेस अनेक मजली मनोऱ्याची उपमा देऊन तिचे अत्यंत मार्मिक विश्रृलेषण मूकनायकाच्या पहिल्या अंकात केले आहे.

जातीभेद असू द्या पण जातीद्वेष मात्र नको असे म्हणणाऱ्या लोकांचा समाचार घेताना शाहू महाराज म्हणतात की, हे मत प्रामाणिकपणाचे असल्यास त्यांच्या अज्ञानाची किव केली पाहिजे. कारण जातीभेदाचे कार्य जातीद्वेष हे आहे.तेव्हा कार्य नाहीसे करण्यास कारणही काढून टाकले पाहिजे. जातीद्वेषाचे उच्चाटन करण्याचा एकच मार्ग म्हणजे सर्व प्रकारचे जातीभेद मोडले गेले पाहिजेत, हे प्रतिपादन करताना महाराज म्हणतात,जातीव्देष हा हिंदुस्थानचा फार पुराणा रोग आहे. परशुरामाने नि:क्षेत्रीय पृथ्वी केली या म्हणण्यात जातीद्वेषाचे प्रतिबिंब पूर्णपणे पडलेले दिसेल. पेशव्याने ब्राह्मणेत्तरांच्या घरावर गाढवाचे नांगर फिरविले याचेही कारण तेच. ज्यांच्या शेंड्या व जानवी श्री शिवाजी महाराज व मराठा विर यांनी रक्षण केले तेच ब्राह्मण मराठे शुद्र आहेत असे बिनदीक्कत प्रतिपादन करतात. याचे कारण दुसरे कोणते? या जातीद्वेषाची उचलबांगडी करायची असेल तर जातीभेदच मोडला पाहिजे. जातिभेद मोडून आपण सर्व एक होऊ या.

शाहू महाराज नेहमी जपान मधील सामुराई या जातीचे उदाहरण देत असत. सामुराई लोक स्वतःला उच्चवर्णीय समजत असत आणि इतर जपानी लोकांना ते हिंन दर्जाचे समजत होते. जपानला एक प्रगत व आधुनिक राष्ट्र बनवायचे असेल तर आपण आपले वर्चस्ववादी हक्क सोडले पाहिजेत असा विचार करून सामुराईने आपले हक्क स्वतःहून सोडून दिले आणि जपान एक सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून उदयाला आलेले आपण पाहतो. जपानमध्ये जे सामुराईने केले ते भारतात ब्राह्मणांनी व क्षत्रियांनी का करू नये? देशाला सामर्थ्यशाली व प्रगत राष्ट्र बनवायचे असेल तर एवढा त्याग करायला काय हरकत आहे असा प्रश्र्न शाहू महाराज विचारतात?

**उपाय** : १९१७ साली नामदार विठ्ठलभाई पटेल यांनी केंद्रीय कायदेमंडळात आंतरजातीय विवाह संबंधातले एक बिल आणलेले होते. याला लोकमान्य टिळक, पूरीचे शंकराचार्य, करवीरचे शंकराचार्य यांनी प्रचंड विरोध केला. कारण धर्म लोप पावून सबगोलांकारहोण्याचा धोका होता. पण समाजाचा सबगोलांकार होण्यातच प्रगतीचे बीज आहे, असे देशातील तेजबहादूर सप्रू, लाला लजपतराय, राजर्षी शाहू महाराज अशा सुधारणावाद्यांना वाटत होते. म्हणून त्याने पटेल बिलास आपला जाहीर पाठिंबा दर्शवला होता.

शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला होता. शाहू महाराज नुसते उपदेश करणारे राजे नव्हते तर ते प्रत्यक्ष कृती करणारे समाज सुधारक होते. त्याने आपली चुलत बहीण चंद्रप्रभाबाई यांचा विवाह इंदूरच्या तुकोजीराव होळकरांचे पुत्र यशवंतराव यांच्याशी निश्र्चित केला. मराठा आणि धनगर असा विवाह घडवून आणण्यात त्यांना यश आले. असे शंभर विवाह घडवून आणण्याचे त्यांनी निश्र्चित केले होते त्यासाठी ६० हजार रुपये खर्चाची तरतूद केलेली होती. या योजनेतील २५ विवाह घडवून आणले होते. महाराजांच्या अकालीन निधनानंतर ही योजना पुढे सरकली नाही.

जातिव्यवस्था टिकून ठेवण्यात व्यवसाय हा मुद्दा महत्त्वाचा होता परंतु शाहू महाराजांनी व्यवसाय बंदी करून जातीव्यवस्थेचा एक पाय लंगडा केलेला दिसतो. आलूतेदार आणि बलुतेदारांना त्यांच्या व्यवसायातून मुक्त केले.२२ फेब्रुवारी १९१८ रोजी बलुतेदार पद्धती खालसा करण्यात आली. त्यामुळे जातीवर आधारित कोणत्याही व्यवसायाची सक्ती राहिलेली नाही.

फासेपारधी ही शूर,काटक व भारी विश्र्वासू जात. त्यांना सोनतळी पहारेकरी नेमण्याचा विक्रम महाराजांनी केला. शाहू महाराजांनी पारधी, कंजारभाट, कुंचीकोरवी,माकडवाले, डोंबारी, कोल्हाटी अशा कितीतरी जमातींच्या लोकांना आपल्या पदरी बाळगले. त्यांना नोकरी दिल्या. स्वतःचे शरीरक्षक, शिकारीतले सहकारी, राखणदार म्हणून त्यांना सेवेत घेतले.

माणूस परिस्थितीने गुन्हेगार बनतो जन्माने नाही अशी कोल्हापूरचे शाहू छत्रपती महाराजांची विचारसरणी होती. म्हणून त्यांनी सुसंस्कृत इंग्रज सरकारचा सेटलमेंट कायदा आपल्या संस्थानात लागू केला नाही.गुन्हेगार जमातीच्या सेटलमेंट्स करण्याऐवजी त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्याचे व त्यांच्यावरील गुन्हेगारीचा शिक्का पुसण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले हे देशातील अन्य कोणत्याच संस्थानिकांनी केलेले नाही.शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत अनेक दलित, भटक्या विमुक्त जाती, गुन्हेगार जाती यांच्या समवेत सहभोजन घेतल्याचे अनेक उदाहरणे त्यांच्या जीवनचरित्रामध्ये दिसून येतात. म्हणून शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने लोकराजा होते. सामाजिक क्रांतीचा उद्गाता म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचा गौरव केला होता.

संदर्भ:- राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, संपादक -जयसिंगराव पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर. दुसरी आवृत्ती २००७

**प्रा.डी.डी.मस्के,बार्शी मो नंबर ९४२३६०९२१८ / ९८८१४२६९३३**

पान १ वरुन

### दणदणीत विजयासह टीम ..

चेंडूवर सॅम करनला पायचीत केले. त्यानंतर सर्वाधिक धावा कपत मैदानात असलेल्या हॅरी ब्रुकला क्लीन बोल्ड करत भारताला मोठे यश मिळवून दिले. त्यानंतर जॉर्डनला पायचीत करत सातवी विकेट मिळवून दिली. तर अक्षरच्या षटकात कुलदीप आणि अक्षरने मिळून लिव्हिंगस्टोनला धावबाद केले.यानंतर हार्दिक पंड्याच्या षटकात सूर्यकुमार शानदार फिल्डिंग करत आदिल रशीदला धावबाद केले तर बुमरहाने १७व्या षटकातील चौथ्या चेंडूवर जोफ्रा आर्चरला पायचीत करत संघाला ६८ धावांनी मोठा विजय मिळवून दिला. भारताकडून अक्षर पटेलने ४ षटकांत २३ धावा देत ३ विकेट्स घेतल्या तर कुलदीपने ४ षटकांत १९ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. तर बुमराहने २ विकेट्स मिळवल्या. तर दोन खेळाडू धावबाद झाले.

भारत इंग्लंडमधील सेमीफायनलची नाणेफेक गमावल्यानंतर टीम इंडिया प्रथम फलंदाजीला आली. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने २० षटकांत ७ गडी गमावून १७१ धावा केल्या. यादरम्यान रोहिच शर्माने ३९ चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारांसह ५७ धावा केल्या. तर, सूर्यकुमार यादवने ३६ चेंडूत४७ धावांचे योगदान दिले. हार्दिक पांड्यानेही १३ चेंडूत २३ धावा केल्या. त्याचवेळी रवींद्र जडेजाने १७ धावांची नाबाद खेळी केली. अक्षर पटेलही १० धावा करून नाबाद राहिला. अक्षर पटेलच्या अखेरच्या षटकातील एका षटकाराने भारत १७१ धावांपर्यंत मजल मारू शकला.

### सशस्त्र सेनेतील जवानांसाठी विभागीय

प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार यांच्या हस्ते वृक्षारोपण

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी बायोस्फिअर्सचे डॉ. सचिन पुणेकर आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना सुवर्ण पिंपळ वृक्ष बीजाचे वाटप करण्यात आले. श्री. पुणेकर यांनी अजान वृक्षाची माहिती दिली

### राज्याच्या अर्थव्यवस्थेत ..

वर्ष २०२२-२३ च्या तुलनेत १०.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. तर देशांतर्गत उत्पन्न २९३.९० लाख कोटी रुपये असून त्यात २०२२-२३ च्या तुलनेत ९.१ टक्के वाढ अपेक्षित आहे. २०२३-२४ मध्ये राज्याचे दरडोई उत्पन्न २,७७,६०३ रुपये इतकं अपेक्षित असून २०२२-२३ मध्ये ते २,५२,३८९ रुपये इतकं होतं. तसेच २०२३-२४ मध्ये देशाचं दरडोई उत्पन्न १,८३,२३६ रुपये असून गेल्या वर्षी ते १,६९,४९६ रुपये इतकं होतं. २०२२-२३ मध्ये दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत तेलंगणा राज्य देशात प्रथम क्रमांकावर असून त्याखालोखाल कर्नाटक, हरियाणा, तामिळनाडू, गुजरात ही राज्ये असून महाराष्ट्र याबाबतीत सहाव्या क्रमांकावर आहे.

### अवैध वाळू वाहतुकीवर वाहतुकीवर

चंद्रभागा नदी पात्रात अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे सुमारे दोन लाख किमतीचे ४ तराफे पुर्णपणे नष्ट करण्यात आले असून कृषा नाना नेहतराव यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच शिरढोण (ता.पंढरपूर) येथून नदीपात्रालगत वाळू चोरी करत असताना एक जेसीबी पकडून तो शासकीय धान्य गोदाम येथे जमा करण्यात आला. त्याचबरोबर पंढरपुर येथील गाढवावरून वाळू चोरी करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध चॅप्टर केस ची कारवाई प्रस्तावित करण्यात आली असल्याचे तहसिलदार सचिन लंगुटे यांनी सांगितले. या भरारी पथकात मंडलाधिकारी विजय शिवशरण, तलाठी अमर पाटील, प्रमोद खंडागळे, श्रीकांत कदम, महेश कुमार सावंत, गणेश पिसे , प्रशांत शिंदे ,वाहन चालक नितीन काळे तसेच पंढरपूर शहर पोलीस स्टेशन चे कर्मचारी सहभागी होते

### आमदार समाधान आवताडे यांचे

यांची शिवसेना आणि काँग्रेसच्या एका आमदाराची वर्णी लावण्यात आले आहे तालुकाध्यक्ष म्हणून भाजपकडून आमदार कालिदास गुळवणकर समाधान आवताडे शिवसेना शिंदे गटाकडून संजय शिरसागर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून किरण लहमाटे आणि काँग्रेसकडून अमित पटेल या पाच आमदारांची निवड तालिका अध्यक्ष म्हणून करण्यात आले आहे. समान अवताडे हे मंगळवेढा मतदार संघातून २०१९ मध्ये पोट निवडणुकीत निवडून आले आहेत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार भगीरथ भालके यांचा विधानसभेच्या पोटनिवडणूक पराभव केला होता मात्र नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातून काँग्रेसच्या पणती शिंदे यांना मताधिक्य मिळाले होते त्यामुळे समाधान आवताडे आणि त्यांचा मतदारसंघ चर्चेत होता




# १५ हजार रुपयांची लाच घेताना २ पोलीस जाळ्यात धाराशिव लाच लुचपत विभागाची कारवाई..

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

धाराशिव/सुधाकर रणदिवेः धाराशिव येथील लाख लोकपात प्रतिबंधक विभागाने कारवाई करीत १५ हजार रुपयांची लाच घेताना २ पोलीस कर्मचारी यांना अटक केली आहे. येरमाळा पोलीस ठाण्यात दाखल एका प्रकरणात ट्रॅक्टर सोडवण्या संदर्भात ही कारवाई करण्यात आली. प्रकाश नामदेव चाफेकर पोलीस हवालदार येरमाळा पोलीस ठाणे, व महेश जालिंदर सांगळे चालक, पोलीस नाईक व विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय तुळजापूर अशी आरोपींची नावे आहेत. त्यांनी १५ हजार रुपये लाचेची मागणी केली होती व पंधरा हजार लाच घेताना रंगेहात अटक केली. यातील तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या असलेला ट्रॅक्टर येरमाळा पोलीस ठाणे येथे दाखल गुण्यामध्ये जप्त असल्यामुळे सदर ट्रॅक्टर सोडवण्यासाठी चाफेकर यांनी सांगळे मार्फतीने तक्रारदार यांचे कडे पंधरा हजार लाचेची मागणी करून पंधरा हजार रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्वीकारल्याने सांगळे यांना ताब्यात घेण्यात आले असून पोलीस स्टेशन तुळजापूर जिल्हा धाराशिव येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. सापळा अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक विकास राठोड यांनी काम पाहिले त्यांना सिद्धाराम म्हेत्रे पोलीस उपअधीक्षक यांचे मार्गदर्शन लाभले, सापळा पथकात पोलीस अंमलदार सचिन शेवाळे, नागेश शेरकर, विष्णू बेळे यांचा समावेश होता. लोकसेवक अथवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी व्यक्ती कायदेशीर काम करून देण्यासाठी मागणी करत असेल तर कार्यालय ०२४७२२२२८७९ व टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.




# खाल्लूया खस्ता... अखेर उद्योजक राजू खरे यांनी बनवला स्वखर्चातून रस्ता

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीःलोकप्रतिनिधी कडे वेळोवेळी मागणी करूनही निधी उपलब्ध होत नसल्याने पंढरपूर तालुक्यातील पळून या ठिकाणी कारंडे वस्ती ते वाघमोडे वस्ती दरम्यान असणारा रस्ता दुर्लक्षित राहिल्याने याबाबत देखील रहिवाशांनी चाळीस वर्ष कष्ट खाल्लूया अखेर मोहोळ विधानसभा मतदारसंघात इच्छुक असणारे संभाव्य उमेदवार उद्योजक राजाभाऊ खरे यांच्याकडे याबाबत गाराने मांडल्यानंतर त्यांनी स्वखर्चातून हा रस्ता गावचे सरपंच विश्र्वास महाडिक यांच्या पुढाकारातून बनवण्यात सुरुवात केल्याने रहिवाशातून समाधान व्यक्त होत आहे

पंढरपूर तालुक्यातील पुळुज या गावात कारण ते वस्ती ते वाघमोडे वस्तीसाठी रस्ता व्हावा याकरिता गेले ४० वर्ष नागरी फोडा पुढाऱ्यांकडे मंत्र्यांकडे घालून साखळी घालत होते परंतु येथील नागरिकांच्या समस्या कोणीही जाणल्या नाहीत आणि रस्ताही झाला नाही पावसाळ्यात रस्त्या अभावी कच्च्या रस्त्याने चिखलातून पाण्यातून वस्तीवर राहणाऱ्या नागरिकांना शालेय विद्यार्थ्यांना विद्यालयात जाण्यासाठी जीवघेणा प्रवास करावा

पावसाळ्यात रस्त्यात वर चिखल राहिल्यास ग्रामस्थांना बाहेरगावी जाण्यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी जाण्यासाठी वस्तीतून बाहेर पडता येत नव्हते याबाबत येथील नागरिकांनी कोणीही दखल घेतली नाही या रोडवर थोडा जरी पाऊस पडला तरी नागरिकांना जाता येत नाही या भागात दूध व्यवसाय मोठ्या प्रमाणात होत आहे लेण्या जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे काही मुलांची लग्न सुद्धा मोडले आहेत याबाबत वस्तीवरील नागरिक सरपंच विश्र्वासराव महाडिक यांच्याकडे गेले व आम्हाला रोड करून द्या व त्यांनी लगेच सांगितले उद्योजक राजीव खरे यांच्याकडे सर्व जावा आणि त्यांना भेटा सर्व नागरिक उद्योजक अजूकऱ्यांना भेटले व त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता लगेचच मुरमीकरण कामास सो करताना सुरुवात केली आणि अनेक पिढ्यापासून असलेली शेतीची व स्वतःची परफेक्ट त्या जमा केली व मुळातच बागायती सुपीक जमीन पावसामुळे चिखलमय होत असेल चालत जाणेही यावं आवश्यक असताना वाहने कशी जाणार यामुळे कित्येक वर्षे या परिसरातील शेतमाल व शेतकऱ्यांच्या घरी पोहोचताना नाकी नऊ होत होते व पावसाळ्यात कित्येक वेळा पिकाची लाखो रुपये नुकसान शेतकरी सहन करत होते व स्वतःच्या खिशातून भरे व आर्थिक मदत राजू खरे यांनी केले आहे वाघमोडे वस्ती व रोड ज्या कामास दिमाखात सुरुवात झाल्यामुळे नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# उल्हासनगर शहरातील अनधिकृत ऑर्केस्ट्राबारवर कारवाई




दैनिक यशसिध्दि न्यूज

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे : उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी सुरु असणा-या ऑर्केस्ट्रा बारचे बेकायदेशिर बांधकामावर कारवाई करणेसाठी मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४. उल्हासनगर यांनी मा. प्रशासक तथा आयुक्त यांना लेखी पत्रान्वये कळविले होते.

त्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रात खाली नमुद केलेल्या ऑर्केस्ट्रा बारच्या बेकायदेशिर बांधकामावर आज दिनांक २६/६/२०२४ रोजी सहायक आयुक्त, प्रभाग समिती व पोलीस विभागाने संयुक्त कारवाई करुन बारमधील बेकायदेशिर बांधकाम निष्कासीत केलेले आहे.

१. एप्पल बार, श्रीराम चौक्, उल्हासनगर-४ २. एंजल बार, श्रीराम चौक, उल्हासनगर-४

शहरातील इतर बारमालकांना देखिल नोटीस बजावण्यात आलेली आहे.

सदर बारमालकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी सुरु असून पडताळणी जे बार बेकायदेशिर आढळून येतील त्यांचेविरुध्द् निष्कासनाची कारवाई करणेसाठी मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अझीझ शेख यांनी सर्व सहायक आयुक्त यांना आदेश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने सर्व सहायक आयुक्तांमार्फत कारवाई सुरु करण्यात आलेली आहे.

# शेतकरी भक्ती महामार्ग रद्द करण्यासाठी एकजुटीने उतरले रस्त्यावर



दैनिक यशसिध्दि न्यूज

बुलढाणा / राहुल साबळे : अधिवेशन काळात सरकारचे लक्ष वेधण्यासाठी गावागावात शेतकऱ्यांनी थाळीनाद आंदोलन केले . प्रस्तावित सिंदखेडराजा शेगाव महामार्ग रद्द करण्यात यावा ह्या मागणी साठी महामार्ग विरोधी कृती समितीने जाहीर केल्यानुसार महाराष्ट्र विधानमंडळ अधिवेशन सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी २७जुन रोजी शेतकरी बांधवांनी व महिलांनी सुध्दा थाळीनाद आंदोलनात भाग घेवून रस्ता रद्द करण्याची आर्त हाक दिली.

अंधेरा, सेवा नगर, अंत्रीखेडेकर ,गांगलगाव, पांढरदेव, करतवाडी घानमोडीमानमोडी, टाकरखेड मुसलमान अशा अनेक गावांतील शेतकऱ्यांनी थाळीनाद करुन महामार्गाला एकजुटीने विरोध दाखवला. कृती समितीचा एकच नारा - महामार्ग रद्द करा , अशा रस्ता विरोधी घोषणाबाजी यावेळी करण्यात आल्या.

आंदोलनस्थळी महिला ढसाढसा रडल्याने पुरुषांनाही अश्रू आवरता आले नाही. या आंदोलनात गावोगावच्या शेतकऱ्यांसोबत दासा पाटील कणखर, डॉ.सत्येंद्र भुसारी, सौ. ज्योती ताई खेडेकर, विनायक सरनाईक , नितिन राजपूत , मुरलीधर येवले, रमेश सपकाळ आदी सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते समाधान म्हस्के, मधुकर सपकाळ, चेतन म्हस्के, नितिन म्हस्के, पंजाबराव कणखर, संदीप म्हळसणे, भागवत सपकाळ, शेषराव पाटील, बंडू जाधव, भारत म्हस्के, मदन वाघ, सोम प्रकाश खेडेकर, भिकाजी खेडेकर, एकनाथराव माळेकर अक्षय वाघ, मधुकर वाघ, परमेश्र्वर म्हळसणे , सौ.शिलाबाई सपकाळ,

सौ.दुर्गाबाई थिगळे आदी अनेक शेतकरी सहभागी झाले होते ज्या गावातून भक्ती मार्ग जात आहे त्या त्या गावातील प्रत्येक गावातील लोकांनी ताळीनंद आंदोलन करून आपला विरोध दाखवला आहे

# पंढरपूर सिंहगडचे प्राध्यापक अल्ताफ मुलानी यांना पेटंट बहाल

पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज

कोर्टी तालुका पंढरपूर येथील एस के एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकमुनिकेशन इंजीनियरिंग विभागात कार्यरत असलेली प्राध्यापक डॉ अल्ताफ मुलानी यांनी स्मार्ट प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेंट मशीन या विभागावर योग्य सरकारकडून डिझाईन पेटंट बहाल करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉक्टर कैलास कारंडे यांनी दिली एस के एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग पंढरपूर मध्ये कार्यरत असलेले प्राध्यापक डॉक्टर अल्ताफ मुलांनी यांनी पेटीएम ची निर्मिती केली आहे यामध्ये या पेटीचा उपयोग कचरा प्लास्टिक कचरा संकलन वर्गीकरण पुनर्वापर आणि विल्हेवाट लावण्याची कार्यक्षमता आणि परिणाम करिता सुधारण्यासाठी स्मार्ट प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रणाली तंत्रज्ञान आणि डेटा विश्र्लेषणाचा लाभ घेते संकलित केलेल्या कचऱ्याचे वर्गीकरण करून ओला व सुका कचरा वेगळा करता येतो



या पेटीएम बद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा एस एन नवले यांच्यासह संस्थेतील सर्व संचालक पंढरपूर सिंहगड कॉलेजमधील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत

# आमदार आवताडे यांच्या मागणीनुसार दूध दराबाबत शनिवारी मंत्रालयात बैठक

दैनिक यशसिध्दि न्यूज

पंढरपूर/प्रतिनिधीः नुकतीच दोन दिवसांपूर्वी आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील दूध संस्था चालक व उत्पादकांशी विचार विनिमय बैठक घेत त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या व या दुध दरवाढीसंदर्भात मुख्यमंत्र्यांना भेटून तुमच्या सर्व मागण्या त्यांच्यासमोर मांडणार असे आश्र्वासन दिले होते त्यानुसार आमदार आवताडे यांनी गुरुवारी सकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दुग्ध विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन उत्पादक शेतकरी व संस्थाचालकांच्या मागण्यांचे पत्र संबंधित मंत्र्यांना दिले असता या दुध दरवाढ प्रश्र्नी तात्काळ बैठक लावण्याचे आदेश मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी महसूल मंत्री तथा दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना दिल्यानंतर दुग्धविकास मंत्र्यांनी शनिवारी सायंकाळी पाच वाजता त्यांच्या दालनात बैठक आयोजित केली असल्याची माहिती आ. समाधान आवताडे यांनी दिली.

आमदार समाधान आवताडे यांनी मंत्री महोदयांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, मागील तीन महिन्यात तापमानात झालेली प्रचंड वाढ,पडलेला दुष्काळ, यामुळे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये दूध उत्पादक शेतकरी जनावरांचे पालन करीत आहेत मात्र त्यांच्या दुधाला आवश्यक दूध दर मिळत नसल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत त्यांना यातून बाहेर काढण्यासाठी पुढील मागण्या मान्य करण्यात याव्यात.



यामध्ये दूध दर कपात व दूध दरवाढ यावर शासनाचे नियंत्रण असले पाहिजे,राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चापेक्षा कमी दर मिळत असल्यामुळे दुधाला प्रति लिटर सात रुपये अनुदान देणे,दुधाच्या दराबाबत दरवर्षी शासनाने दुधाच्या उत्पादन खर्चावर आधारित एम एस पी व एफ आर पी ठरवणे बाबत आयोग तयार करणे, दुधाचे उत्पादन पॅकिंग व मार्केटिंग बाबत स्वतंत्र धोरण ठरवणे, दूध व दुग्धजन्य पदार्थातील भेसळवर कडक धोरण राबवणे,शासकीय दूध योजना पुनर्जीवित करण्याकरता विशेष प्रयत्न करणे, म्हशीच्या दुधाच्या उत्पादनाचा प्रतिलिटर खर्च ६० रुपये तर गाईच्या दुधाच्या उत्पादनाचा खर्च प्रति लिटर ३५ रुपये असा आहे म्हणून गाईच्या दुधास ४० रुपये आणि म्हशीच्या दुधात ७० रुपये असा दर जाहीर करणे,जनावरांच्या गोठा निर्मितीसाठी एमआरजीएस मधील ६०:४० चे धोरण बदलून ९५:५ असे करणे, पंढरपुरी म्हशीचे संगोपन करणाऱ्या गवळी समाजास थेट मदत करणे,जनावरांचा विमा शासनाने उतरणे अशा मागणी आमदार समाधान आवताडे यांनी निवेदनाद्वारे करून दूध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली आहे त्यानुसार मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी तात्काळ बैठकीचे आदेश दिल्यानंतर उद्या शनिवारी सायंकाळी पाच वाजता महसूल मंत्री तथा दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दालनात तात्काळ बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी बोलताना दिली.

# खेडेकर यांचा विठ्ठल मंदिरसमितीच्यावतीने सत्कार

पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज

संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभ दादा खेडेकर यांनी आज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले यावेळी मंदिर समितीचे वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला



याप्रसंगी संभाजी ब्रिगेडची पुणे विभागीय अध्यक्ष किरण घाडगे शहराध्यक्ष स्वागत कदम वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक तानाजी जाधव जिल्हाध्यक्ष सचिन जगताप तालुका अध्यक्ष बाळासाहेब बागल पुरुषोत्तम देशमुख शेखर आटकळे पत्रकार नवनाथ खिलारे संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन व जीर्णोद्धार ची कामे पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सुरू असलेल्या व करण्यात येणाऱ्या कामाची माहिती यावेळी संभाव्य पुणे विभागीय अध्यक्ष किरण राज घाडगे यांच्याकडून माहिती सांगण्यात आली

# मा उपविभागीय अधिकाऱ्यांनीही शेतकऱ्यांच्या तोंडाला पुसली पाने

दैनिक यशसिध्दि न्यूज

बुलढाणा/राहुल साबळे : शासन दरबारीं शेतकऱ्यांवर पीकविमा कंपनीचीच वरचढ, वैतागलेल्या शेतकऱ्यांचा सामूहिक जलसमाधी चा निर्धार मातृतीर्थ सिंदखेड राजा व देऊळगाव राजा येथील प्रलंबित सिंदखेड राजा तालुक्यातील शेतकऱ्यांना सरसकट पिक विमा मिळविण्यासाठी व शेडनेट पिक विमा व मदत मिळवण्यासाठी व इतर १७ अनेक मागण्या श्री बालाजी सोसे व श्री गजानन जायभाये यांनी मागील आठवड्यात दिलेल्या आत्मदहन आंदोलन शामविण्यासाठी प्रशासनाने २६ जून ची ठेवलेली बैठक निष्फळ ठरली आणि प्रशासनाने पीकविमा कंपनीच्या प्रतिनिधीच्या फीडिंग पुढे हतबल होत शेतकऱ्यांची अक्षरशः चॉकलेट वर बोळवण करण्याचा प्रयत्न केला परंतु शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या विविध संयुक्तिक प्रश्नावली मुळे प्रशासन हतबल झालेले दिसून आले आणि शेवटी जेव्हा वरतून येईल तेव्हाच विमा मिळेल असा सावध पवित्रा घेतला.

याचा निषेध म्हणून शेतकऱ्यांनी दिनांक ३० जून पर्यंत विमा प्रश्नावर निर्णय न झाल्यास सामूहिक जलसंमाधी आंदोलनाचा इशारा प्रशासनाला दिला आहे. यावेळी शेतकऱ्यांनी आपला सर्व रोष कृषी विभाग व पीकविमा कंपनीच्या प्रतिनिधीनवर नाराजी व्यक्त करत निषेध व्यक्त केला.




या प्रसंगी शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. शेतकऱ्यांची बाजू अत्यंत अभ्यासू व आक्रमक पणे मांडण्यासाठी बालाजी सोसे व श्री गजानन जायभाये यांच्या सोबतीला बळीवंश लोकचळवळीचे श्री नितीन कायंदे, श्री भगवान पालवे, किशोर कायंदे, श्री राजेश फुलझाडे व सिंदखेडराजा युवा संघर्ष समिती अध्यक्ष श्री. कैलास मेहेत्रे शेतकरी नेते शिवराज भाऊ कायदे उध्दव मुंढे छगन धायतडक देवानंद सोसे परमेश्र्वर पालवे सिनगाव जहाँगीर , पांगरी माळी येथील शेतकरी देवानंद भानुदास काकड रामकृष्ण विष्णू डोईफोडे समाधान रमेश डोईफोडे राजेंद्र देवराव होलगरे दिलीप देवराव होलगरे विष्णू तुळशीराम होलगरे सुरेश कोल्हे किसन कोल्हे दत्तात्रय तुळशीराम होलगरेव ईतर असंख्य शेतकरी उपस्थित होते. शासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी श्री खडसे, ना तहसीलदार अस्मा मुजावर, कृषी अधिकारी श्री पांचाळ व पीकविमा कंपनी चे श्री मांटे यासमवेत विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# राजू जुगळे म्हणजे विद्यार्थी,शिक्षक,शाळा व संघटनांसाठी कार्य करणारे व्यक्तिमत्व : दामोदर सुतार

दैनिक यशसिध्दि न्यूज

पत्रकार नामदेव निर्मळे : कुरुंदवाड:केंद्रीय शाळा कन्या दत्तवाड शाळेचे मुख्याध्यापक राजू भूपाल जुगळे म्हणजे विद्यार्थी,शिक्षक,शाळा व संघटनांसाठी कार्य करणारे व्यक्तिमत्व असल्याचे प्रतिपादन शिक्षक नेते दामोदर सुतार यांनी केले.

केंद्रीय शाळा कन्या दत्तवाड चे सेवानिवृत्त मुख्याध्यापक राजू भूपाल जुगळे यांच्या सेवानिवृत्तीनिमित सदिच्छा कार्यक्रम जैन सांस्कृतिक सभागृह कुरुंदवाड येथे संपन्न झाला.

याप्रसंगी रविकुमार पाटील, बाबासो वनकोरे,दिपक कामत,एन.व्ही.पाटील, अभिनंदन जुगळे,बजरंग काळे,अरविंद मजलेकर,श्र्वेता खांडेकर,भगवान कोळी, राजमोहन पाटील,सुनिल एडके,तुकाराम राजुगडे यांनी मनोगतातून राजू जुगळे यांच्या योगदानाचे कौतुक केले.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघटना उपशाखा शिरोळ व केंद्रीय शाळा कन्या दत्तवाड यांच्या वतीने मानपत्र देवून सत्कार करण्यात आला.या प्रसंगी दत्तवाडचे सरपंच चंद्रकांत कांबळे,अल्लाउद्दीन दानवाडे,भूपाल दिवटे,संभाजी बापट,बी.एस. पाटील,अनिल ओमासे,खुशाल कांबळे, उत्तम कोळी, अशोक कोळी,सुरेश पाटील, बजरंग लगारे, बाजीराव कांबळे,श्रीकांत चव्हाण,स्मिता डिग्रजे,विजयकुमार भोसले, महंमदहनिफ मुल्ला,प्रकाश खोत,मेहबूब मुजावर,दिलीप शिरढोणे,चंद्रकला पाटील,सचिन पाटील,दादा पाटील,दिलीप पाटील,तुकाराम चिगरे, बाजीराव गोरे,राजू यळगुडे,राजाराम सुतार,उत्तम सुतार,मदनकुमार कांबळे, आशिष लट्ठे,अजित मजलेकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रेखा व उदय गायकवाड यांनी केले.



# राजर्षी शाहू महाराज यांची १५० वी जयंती, वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर व जिल्ह्याच्या वतीने विविध कार्यक्रमाने साजरी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्हा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात पार पाडले प्रथमतः .डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथील राजर्षी शाहू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .परमपूज्य विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून वंदन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्व जनसमुदायाला लाडू वाटप करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेचे रावजी सखाराम हायस्कूल ऑफ कॉमर्स या शाळेमध्ये तीनशे विद्यार्थ्यांना वह्या ,कंपास, पेन इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले, त्यानंतर वंचित बहुजन आघाडी परिषदेत मंजूर केलेल्या अकरा ठरावाचे वाचन सामूहिक रित्या करण्यात आले. या कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडी खांबे, जिल्हा ओबीसी समाजाचे नेते शेखर बंगाळे व ओबीसी महासंघाच्या प्रदेशाध्यक्ष पारपल्ली मॅडम ,महासचिव अनिरुद्ध वाघमारे जिल्हा युवकाध्यक्ष पांडुरंग खांडेकर, जिल्हा संघटक गौतम बनसोडे, सोलापूर शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, शहर महासचिव विनोद इंगळे ,संजय हरिजन ,महिला शहराध्यक्ष पल्लवी ताई सुरवसे सुजाता वाघमारे ,भारतीताई पाटसकर ,माथाडी कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष ज्योतिर्लिंग स्वामी मालक महासचिव प्राध्यापक सुरज आरकराव ,सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे राज्य प्रवक्ते रवी पोटे ,सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष संघपाल काकडे ,फुले आंबेडकर विद्वत सभेचे व्ही बी भालशंकर साहेब, दक्षिण तालुका युवक अध्यक्ष अमर डुरके ,सुरेश साबळे तसेच माझी जिल्हाध्यक्ष नाना कदम, माजी नगर सेवक मल्लाप्पा शिंदे ,भारिपचे माजी जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड शिवाजी आप्पा बनसोडे ,यांची प्रमुख उपस्थिती होती.

,मोहोळ तालुकाध्यक्ष :- धीरज कसबे ,पंढरपूर तालुका अध्यक्ष:- संतोष कांबळे,मंगळवेढा तालुकाध्यक्ष :-अशोक माने,तालुका दक्षिण पश्र्चिमचे अध्यक्ष :- सुरेश देशमुख *तालुका दक्षिण पूर्वचे अध्यक्ष :-शंकर शिंदे,बार्शी तालुकाध्यक्ष :- बाबासाहेब गायकवाड,दक्षिण तालुका महिला अध्यक्ष :- सुरेखाताई साबळे अक्कलकोट शहराध्यक्ष विशाल ठोंबरे, तालुका महासचिव नागेश हरवाळकर, युवक जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश शिंदे, शहर महासचिव भारत देडे, उपाध्यक्ष शिवाजी चौगुले ,तालुका संघटक बबन गायकवाड, तालुका उपाध्यक्ष अमृत सोनकांबळे या कार्यक्रमाला एडवोकेट गौतम जगताप सुनील धंदाडे ,संभाजी कांबळे ,विनोद शिवशरण ,विजयानंद उघडे ,अभिजीत गायकवाड ,गौतम थापटे, प्रफुल्ल दुपारगुडे ,विक्रांत गायकवाड ,श्रीनिवास संगेपाक ,झाकीर भाई शेख , , दत्ता बालशंकर, विनोद जाधव ,विशाल जेटी थोर ,सचिन गायकवाड सर ,इंद्रजीत कांबळे ,इत्यादी बहुसंख्या कार्यकर्ते उपस्थित होते .हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रावजी सखाराम जुनिअर कॉलेजचे प्राचार्य माननीय संतोष वालवडकर सर ,माननीय आनंदकुमार मुरूमकर सर ,माननीय चंद्रकला मोरे मॅडम ,माननीय अजहर शेख सर



,माननीय अण्णा दीक्षित, माननीय गजानन गोरे सर ,माननीय वंदना डांगे मॅडम ,माननीय साजिदा बागवान मॅडम ,माननीय प्रतिभा भोसले मॅडम माननीय सुनीता पाटील मॅडम ,माननीय महावीर आळंदीकर सर यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

# केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करून सोलापूरातील आय.टी.संकुल तात्काळ सुरू करण्यासाठी यथाशक्ती प्रयत्न करणार ; सोलापूर विकास मंच

## सोलापूरच्या आय.टी. क्षेत्रात कार्यरत उद्योजकांनी सोलापूर विकास मंचकडे रितसर सादर करावा प्रस्ताव

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी : विकास मंचच्या पुढाकाराने सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनच्या सहकार्याने सोलापूरच्या आय.टी. क्षेत्रात कार्यरत उद्योजकांची एम.आय.डि.सी., सांगली विभागीय अधिकारी वसुंधरा जाधव बिर्जे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सोलापुरातील २३ वर्षांपूर्वी सर्व सोयीसुविधांनी अद्यावत अशी चिंचोळी एम.आय.डि.सी.तील भव्यदिव्य आय.टी. संकुल सोलापूरच्या आय.टी. तथा इतर अलाईंड सर्व्हिस मध्ये कार्यरत असलेल्या उद्योगजकांना माफक सवलतपर दरात उपलब्ध करून घेण्यासाठी तथा इतर महत्त्वपूर्ण मागण्या केंद्र तथा राज्य शासनाकडे पाठपुरावा करून त्या सोडविण्यासाठी सदर बैठकीत विचार मंथन झाले.



सोलापूरच्या औद्योगिक विकासासाठी आणि सोलापूरात आय.टी.क्षेत्रात कार्यरत असलेल्या उद्योगजकांच्या मदतीसाठी सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनची सदैव आपल्याला साथीला असुन चिंचोळी एम.आय.डि.सी. मध्ये लोडशेडिंग विरहित २४ तास वीज पुरवठा, अद्यावत अग्निशमन व्यवस्था, पोलीस चौकी, चार तारांकित हॉटेल, दोन राष्ट्रीयकृत बँका, इ.एस.आय.सी. दवाखाना, हाय वे कनेक्टिव्हिटी ह्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध असल्याची माहिती एस.आय.ए.चे उपाध्यक्ष गणेश सुत्रावे यांनी दिली. सोलापूरात सुमारे ७८ लघु व मध्यम आकाराच्या नोंदणीकृत आय.टी. कंपन्यां कार्यरत असुन त्या सगळ्यांना एकत्रित अतिशय भव्यदिव्य तथा सर्व सोयीसुविधांनी अद्यावत चिंचोळी एम.आय.डि.सी.तील आय.टी. भवन मध्ये नाममात्र दरात सर्व सोयीसुविधांनी उपलब्ध झाल्यास सोलापूर हे जागतिक पातळीवर नवीन आय.टी. डेस्टिनेशन होईल असा सकारात्मक विचार सोलापूर विकास मंचचे सदस्य विजय कुंदन जाधव यांनी त्यांच्या प्रस्ताविकेत व्यक्त केले.

केंद्र तथा राज्य सरकारने सोलापूरच्या आय.टी. क्षेत्रात कार्यरत उद्योजकांना सबसिडायाईझ रेट मध्ये ऑफिस स्पेस, सबसिडायाईझ हाय स्पीड इंटरनेट कनेक्शन, सात दिवसांत सरकारच्या विविध विभागांचे बिनदिक्कत परवाने आणि परवानग्या, शुन्य ते जास्तीत जास्त ०५% जी.एस.टि. कर सवलत, सबसिडायाईझ वीज पुरवठा, मुकलक पाणी पुरवठा, महिलांसाठी विषेश सुरक्षा व्यवस्था, माफक, किफायतशीर तथा आरामदायी परिवहन कींवा खासगी पब्लिक ट्रान्सपोर्ट सेवा ह्या प्रमुख मागण्या सदर बैठकीत करण्यात आल्या. सोलापूरात कार्यरत उद्योजकांनी आजच्या बैठकीत मांडलेल्या सर्व मागण्यांचे रितसर निवेदनपर प्रस्ताव सोलापूर विकास मंचकडे पाठवा सादर करा ते आमच्या हा प्रस्ताव सादर करतील आणि आमच्या वरिष्ठ कार्यालयाच्या वतीने आपण दिलेल्या प्रस्तावावर योग्य ती कारवाई केली जाईल असा सकारात्मक प्रतिसाद विभागीय अधिकारी वसुंधरा जाधव बिर्जे यांनी व्यक्त केला.

२३ वर्षांपासून प्रलंबित आय.टी.भवन सोलापूरच्या आय.टी. क्षेत्रात कार्यरत उद्योजकांना मिळवुन देण्यासाठी राज्य सरकारच्या औद्योगिक विभागाचे उच्च अधिकार्यां तथा उद्योग मंत्र्यां समवेत बैठक घेऊन हा विषय तडिस लावण्यासाठी सोलापूर विकास मंच पाठपुरावा करून सोलापूरातील आय.टी.संकुल तात्काळ सुरू करण्यासाठी यथाशक्ती प्रयत्न करणार असल्याची आश्र्वासन सोलापूर विकास मंचच्या पदाधिकाऱ्यांनी ह्या बैठकीत उपस्थित सोलापूरच्या आय.टी. उद्योगजकांना दिले. ह्यावेळी एम.आय.डि.सी.सोलापूरचे अधिकारी गणपत कोळेकर, इंडस्ट्रीज असोसिएशनचे उपाध्यक्ष गणेश सुत्रावे, सोलापूरात आय.टी.क्षेत्रात कार्यरत असलेले सारंग तारे, सुधीर माने, प्रदिप मोरे, अरविंद रंगा, रविंद्र कुलकर्णी, अतुल कोटा, महेश जिंदम, गुरु पलमुर, संगमेश्र्वर अंडेली, शंकर पाटील, तपन मंगनपल्ली, धनराज बगले, तेजस जक्कल, निखिल मोरे, रमेश वायचळ, मल्लिकार्जुन गिवारे, विजयराज बाहेती, प्रदिप दराडे, संगमेश्र्वर कांती, विक्रम गिड्डे, राज म्हमाणे, समर्थ अडकी, राजेश कटारे, सुशुत्र म्हेत्रास, समर्थ सरवदे, गंगाधर थळंगे, संतोष मोहोळकर, तेजश्री गायकवाड, श्रीकांत हेडगे, ओंकार मठपती, सोहेल मुजावर, श्रवण पंडुवाले, जयवंत अकेन, रमेश मनगारे, माऊली झांबरे, श्रीकांत अंजुटगी, अमित कामतकार, सोलापूर विकास मंचचे सदस्य केतन शहा, योगिन गुर्जर, विजय कुंदन जाधव, ॲड.दत्तात्रय अंबुरे, आनंद पाटील, यशवंत बोधे, महेश हणमे, गणेश शिलेदार, आरती अरगडे, गौरी आमडेकर, जयश्री तासगावकर, इक्बाल हुंडेकरी, परवेझ पिरजादे आदी मान्यवर सदस्य उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचालन सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनचे विनायक दुदगी यांनी केले आणि उपस्थितांचे आभार सोलापूर विकास मंचचे योगिन गुर्जर मानले.



# बेडसे बुद्ध लेणीवर कार्यशाळा संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

ठाणे/मिलिंद जाधव : आपल्याला लाभलेला अनमोल असा बुद्ध लेण्यांचा ठेवा याचे जतन आणि संवर्धन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. यासाठी दर महिन्यात दानपारमिता फाऊंडेशन महाराष्ट्रातील बुद्ध लेण्यांवर कार्यशाळा आयोजित करते. तर यावेळी २३ जून,२०२४ रोजी मावळ तालुक्यातील बेडसे या बुद्ध लेणीवर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी चंचल मन स्थिर करण्यासाठी अनापान करण्यात आले. स्तूपाची रचना कशी झाली, त्यामागील इतिहास, चैत्यगृहाची स्थापत्यकला याबद्दल आकाश हजारे यांनी माहिती दिली. धम्म लिपी आणि पाली भाषा यांमधील फरक समजावून सांगितला. रुपाली गायकवाड यांनी वेगवेगळी उदाहरणे देऊन लेणीची माहिती दिली. औरंगाबादमधील भिंतीवर सुंदर असे गौतम बुद्धांचे चित्र आणि बेडसे लेणी मधे चैत्यगृहातील खांबांवर असलेले रंग याचा इतिहास रुपाली गायकवाड यांनी सांगितला..ज्येष्ठ पौर्णिमा असल्यामुळे भंते धम्मरखीत यांनी त्रिसरण, पंचशील घेऊन उपस्थित असलेल्या उपासकांना आपल्या अमृतवाणीत धम्मदेसना दिली. यावेळी सुनील खरे , प्रविण जाधव , संतोष अंभोरे यांनी उपस्थितांचे पुष्प देऊन स्वागत केले. त्यानंतर स्नेहभोजन करण्यात आले. दानपारमिता फाऊंडेशनचे अध्यक्ष सुनील खरे ,प्रविण जाधव , संतोष अंभोरे यांनी संपूर्ण कार्यशाळेत मार्गदर्शन केले. त्यांनी शिलालेखांचे वाचन करून त्याचा अर्थ व त्याचे महत्त्व पटवून दिले. धम्मलिपी शिकलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.तर नव्याने आलेल्या लेणी अभ्यासकांनी आपले मनोगत व्यक्त केले..लेणीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे लेण्यांवर झालेले अतिक्रमण, नष्ट होत चाललेला बौद्ध संस्कृतीचा इतिहास या सगळ्या गोष्टींसाठी दानपारमिता फाऊंडेशन विशेष प्रयत्न करत आहे. चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या काळातील अशोककालीन धम्मलिपी आणि सातवाहनकालीन धम्मलिपी याचे प्रशिक्षण दानपारमिता फाऊंडेशन गेली अनेक वर्षे निःशुल्क शिकवत आहे. फक्त लेणीवर यायचं, फोटो काढून जायचं यामुळे आपल्याला लेणी समजणार नाही. त्यासाठी प्रत्यक्ष आपल्याला लेणींचा बारकाईने निरीक्षण आणि अभ्यास करायला पाहिजे. आपल्याला धम्मलिपी आणि पाली भाषा शिकायला पाहिजे. तेव्हा आपल्याला आपला इतिहास समजेल असे यावेळी दान पारमिता फाउंडेशनच्या माध्यमातून सांगण्यात आले.

# शहरात ओवेसी यांच्या प्रतिमेला मारले जोडे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः लोकसभेत खासदारकीची शपथ घेताना एमआयएम नेते असदुद्दीन ओवेसी यांनी 'जय फिलिस्तान' म्हणून नारा दिल्यामुळे त्यांच्या विरोधात सोलापुरात शिवसेना एकनाथ शिंदे गटाने रस्त्यावर उतरून आंदोलन केले. ओवेसी यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करून त्यांची खासदारकी तातडीने रद्द करण्याची मागणीही करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवसेना शिंदे गटाच्या जिल्हा कार्यालयाबाहेर हे आंदोलन करण्यात आले. पक्षाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात तुकाराम म्हस्के, राजकुमार शिंदे, मनीषा नलावडे, संजय सरवदे यांच्यासह बहुसंख्य शिवसैनिक सहभागी झाले होते. यावेळी कार्यकर्त्यांनी ओवैसी यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी ओवेसी यांच्या वर्तणुकीबद्दल तीव्र भावना व्यक्त करताना शिंदे म्हणाले, असदुद्दीन ओवेसी यांनी संसदेत खासदारकीची शपथ घेत असताना 'जय फिलिस्तान' चा नारा देणे धक्कादायक आहे. त्यांचे हे वागणे संविधानाचा सरळ सरळ अवमान आहे. त्यांच्या वागण्या-बोलण्यातून नेहमीच वाद निर्माण होतात.

# नळदुर्गचा ऐतिहासिक किल्ला युनिटी मल्टीकॉन प्रायव्हेट लिमिटेड सोलापूर या कंपनीलाच देण्यात यावे : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची मागणी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

वागदरी/एस.के.गायकवाड : महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाने तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ला हा युनिटी मल्टीकॉन प्रायव्हेट लिमिटेड सोलापूर या कंपनीलाच संवर्धन व जतन करण्यासाठी द्यावा अशी शिफारस वजा मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई तालुका शाखा तुळजापूरच्या वतीने करण्यात येत आहे. सन २०१४ साली युनिटी मल्टीकॉन प्रायव्हेट कंपनी लिमिटेड सोलापूर या कंपनीला संवर्धन व जतन करण्यासाठी (बिओटी तत्वावर )१० वर्षाच्या मुदतिवर हा किल्ला देण्यात आला होता. दरम्यान युनिटी मल्टीकॉन्स ने या दहा वर्षाच्या काळात अत्यंत सुंदर अशी कामे केलेली आहेत किल्ल्याचे संपूर्ण रूप बदलून गेले आहे आज धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग ता. तुळजापूर येथे देशातील पर्यटक येथील ऐतिहासिक किल्ला पहाण्यासाठी येतात यामुळे नळदुर्ग हे पर्यटकांचे एक खूप मोठे आकर्षण स्थळ म्हणून ओळखले जात आहे.पावसाळ्यात या किल्ल्यातील नर-मदी धबधबे प्रवाहीत झाल्यावर नर-मादी ऊधबधब्याचे नयनरम्य दृश्य पहाण्यासाठी दरवर्षी लोखो पर्यटक येतात.पर्यटकांच्या दृष्टीने युनिटी मल्टीकॉन



कंपनी लिमिटेड सोलापूर ने अत्याधुनिक सुविधा येथे निर्माण केलेल्या आहेत.सध्या युनिटी मल्टीकॉन प्रायव्हेट कंपनी लिमिटेड सोलापूर ची दहा वर्षांची मुदत संपली असून पुढील दहा वर्षासाठी नळदुर्ग चा भुईकोट किल्ला हा युनिटी मल्टीकॉन्सला संवर्धन व जतन करण्यासाठी देण्यात यावे या मागणीचे निवेदन सांस्कृतिक मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांना महाराष्ट्र पत्रकार संघ मुंबई तालुका शाखा तुळजापूरच्या वतीने देण्यात आले आहे.

सांस्कृतिक मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई तालुका शाखा तुळजापूरच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनावर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे, पत्रकार संघाचे इरफान काझी,एस.के.गायकवाड, किशोर धुमाळ, अहमद शेख,शाम नागीले सह पत्रकारांच्या सह्या आहेत.



# चुंगी येथे राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट /प्रतिनिधी :राजर्षी शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त चुंगी येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी अक्कलकोट तालुका समतादुत नालंदा चंदनशिवे यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक व राजकीय शैक्षणिक कार्या संदर्भात माहिती दिली व संबंध महाराष्ट्र मध्ये सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरा केला जातो या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागाच्या सर्व योजनांची माहिती देऊन जयंती साजरी करण्यात आली सदर कार्यक्रमासअनिता स्वमीराव खंदारे,( आधुनिक लहुजी सेना अध्यक्ष) राणी अंकुश खंदारे, अश्र्विनी संतोष यादव, गंगुबाई धोंडीबा खंदारे, स्वामीराव बळीराम खंदारे, आनंदराव माने, दत्ता कोळी, नवनाथ बोरकर, शिवाजी कोळी.प्रतिकराज खंदारे उपस्थित होते.